एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका या मानधनी कर्मचाऱ्यांना सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामधील "भाऊबीज भेट" रक्कम देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः एबावि-२०१७/प्र.क्र.२११/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २९ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१७/प्र.क्र.२११/का.६ दिनांक २४ नोव्हेंबर २०१७

शासन शुध्दीपत्रक :-

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत ९७४७५ अंगणवाडी सेविका, ९७४७५ अंगणवाडी मदतनीस व १३०११ मिनी अंगणवाडी सेविका अशा एकूण २,०७,९६१ मानधनी कर्मचाऱ्यांना सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी प्रत्येकी १,०००/- प्रमाणे भाऊबीज भेट मंजूर करण्यास दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयात भाऊबीज भेट मंजूर करण्यासाठी एकुण किती निधी मंजूर करण्यात आलेला आहे त्याचा उल्लेख करावयाचा राहुन गेलेला होता.

२. अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना भाऊबीज भेट अदा करण्याकरिता सन २०१७-१८ साठी मागणी क्रमांक :- एक्स-१, २२३६, पोषण आहार, (०८) (०६) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (भाऊबीज भेट) (अतिरिक्त राज्य हिस्सा १००%) (२२३६ १९५४),या लेखाशीर्षाखाली रुपये २०६१.२५ लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. सदर १००% निधी भाऊबीज भेट अदा करण्यासाठी खर्च करण्यास वित्त विभागाने मंजूरी दिलेली आहे. त्याप्रमाणे निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना उपलब्ध करुन देण्यात येत असून त्यांनी सर्व संबधितांना तातडीने निधी वितरीत करावा.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२९१४३७०८८५३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2017.11.29 15:45:03 +05'30'

(ला.रा.गुजर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री / राज्यमंत्री, महिला व बाल विकास, मंत्रालय, मुंबई

४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
६) आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे
७) सर्व मंत्रालयीन विभाग
८) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र मुंबई / नागपूर
९) महासंचालक, राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन, नवी मुंबई
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई
११) सर्व विभागीय आयुक्त
१२) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, विधानभवन, मुंबई
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१५) सर्व विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग
१६) सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) वित्त विभाग/व्यय-६, मंत्रालय, मुंबई
१९) नियोजन विभाग/का.१४७२, मंत्रालय, मुंबई
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२१) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
२२) सहायक संचालक (वित्त व लेखा), एबाविसेयो, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
२३) सर्व महिला व बाल विकास अधिकारी, (जिल्हा परिषद)
२४) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण / आदिवासी / नागरी)
२५) महिला व बाल विकास विभागातील सर्व कार्यासने
२६) निवड नस्ती (कार्यासन ६)